INDIAN NATIONAL CONGRESS

# महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी

टिळक भवन, काकासाहेब गाडगीळ मार्ग, दादर, मुंबई - ४०० ०२५.
Email - office@mahacongress.com

दुरध्वनी - २४२३३०००
२४३०१३०१
२४३०१३६१
फॅक्स - २४२२५७३३

दि. ७ जून २०२४

**मा. श्री. रमेशजी बैस**

मा. राज्यपाल, महाराष्ट्र

राजभवन, मुंबई

**विषय – दुष्काळाने होरपळणा-या महाराष्ट्रातील जनतेला तातडीने मदत देण्याबाबत**
तसेच [सरसकट] कर्जमाफी देण्याबाबत

महोदय,

राज्यातील जनता सध्या भीषण दुष्काळाचा सामना करत आहे. जवळपास १० हजारांपेक्षा जास्त गावांमध्ये टॅकरने पाणी पुरवठा करावा लागत आहेत. आजही हजारो वाड्या-वस्ता पिण्याचे पाणी व जनावरांच्या चाऱ्यांपासून वंचित आहेत. शेतकरी संकटात आहे. हंडाभर पाण्यासाठी माता भगिनींना पायपीट करावी लागत आहे. धरणामधील पाणी साठ्याने तळ गाठला आहे. मुंबईसह अनेक शहराच्या पाणी पुरवण्यातही कपात केली जात आहे. पिण्याच्या पाण्याचे भीषण संकट आहे. शेतीला पाणी मिळणेही दुरापास्त झाले आहे. शेतक-यांनी आपल्या पोटच्या लेकराप्रमाणे वर्षानुवर्षे सांभाळलेल्या फळबागा वाळून गेल्या आहेत. शेतकरी आत्महत्या मोठ्या प्रमाणात वाढल्या आहेत. संपूर्ण राज्यातील जनता अत्यंत अडचणींचा सामना करत आहे.

दुष्काळग्रस्तांना तातडीने मदत करावी अशी मागणी विरोधी पक्ष सातत्याने करत आहेत पण सरकार मात्र अजगरासारखे सुस्त पडून आहे. राज्यातील जनता दुष्काळाने होरपळत असतानाही सत्ताधारी पक्ष त्याकडे फारसे गांभिर्याने पाहत नाही, हे अत्यंत दुर्दैवी आहे. सरकार केवळ आढावा बैठक घेण्याचे सोपस्कार पार

INDIAN NATIONAL CONGRESS

# महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी

टिळक भवन, काकासाहेब गाडगीळ मार्ग, दादर, मुंबई - ४०० ०२५.
Email - office@mahacongress.com

दुरध्वनी -२४२३३०००
२४३०१३०१
२४३०१३६१
फॅक्स - २४२२५७३३

पाडत आहे. मुख्यमंत्र्यांनी बोलावलेल्या बैठकीला अनेक पालकमंत्री गैरहजर होते त्यामुळे सरकारला दुष्काळी परिस्थितीचे गांभीर्य नाही हे स्पष्ट झाले आहे.

जनतेला दुष्काळाचे चटके बसत असताना त्यांना मदत करणे हे सरकारचे कर्तव्यच आहे पण सत्ताधारी पक्ष निवडणुका व राजकीय साठमारीत व्यस्त असल्याचे दिसत आहे. सरकारचे दुष्काळाकडे होत असलेले दुर्लक्ष पाहता आपण या प्रश्नी लक्ष घालून जनतेला मदत देण्यासाठी पुढाकार घ्यावा. शेतकऱ्यांची अवस्था पाहता कोरडवाहू शेतीला एकरी २५ हजार रुपये तर बागायती शेतीला एकरी ५० हजार रुपयांची तसेच फळबागांना एकरी १ लाख रुपये मदत तातडीने द्यावी, जनावरांसाठी चारा छावण्या सुरु कराव्यात व पिण्याच्या पाण्याची सोय करावी. खरीपाच्या पेरणीसाठी खते आणि बियाणे सरकारने पुरवावे अशी आमची मागणी आहे. दुष्काळाचे गांभीर्य लक्षात घेऊन आपण राज्य सरकारला निर्देश द्यावेत अशी आमची विनंती आहे.

यासोबतच संपूर्ण देशाचे प्रेरणास्थान असणारे युगपुरुष छत्रपती शिवाजी महाराज, राष्ट्रपिता महात्मा गांधी, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे संसद भवन परिसरातील पुतळे केंद्र सरकारने हटवले आहेत. हे अत्यंत दुर्दैवी आणि निषेधार्ह आहे. सरकारने तात्काळ हे पुतळे पुर्नस्थापीत करावेत अशी आमची मागणी आहे.

यासोबतच डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रज्ञान विद्यापीठ लोणेरे या विद्यापीठाच्या परीक्षा आणि निकालामध्ये मोठ्या प्रमाणात अनिमियतता आणि गैरप्रकार झाल्याच्या विद्यार्थ्यांच्या तक्रारी आहेत. त्याचा हजारो विद्यार्थ्यांच्या भविष्यावर विपरीत परिणाम होणार आहे. विद्यापीठाचे ईआरपी पोर्टल 4 महिन्यांपासून बंद आहे, विद्यार्थी या ग्रेड सिस्टममधील गुण ओळखू शकत नाहीत. तसेच ते नोकरी, शिष्यवृत्ती किंवा पुढील अभ्यासासाठी अर्ज करू शकत नाहीत. 100 पेक्षा जास्त

INDIAN NATIONAL CONGRESS

# महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी

टिळक भवन, काकासाहेब गाडगीळ मार्ग, दादर, मुंबई - ४०० ०२५.
Email - office@mahacongress.com

दुरध्वनी - २४२३३०००
२४३०१३०१
२४३०१३६१
फॅक्स - २४२२५७३३

दिवस उलटूनही अंतिम वर्ष आणि पुरवणी परीक्षेचे निकाल पूर्णपणे जाहीर केलेले नाहीत, ज्यामुळे विद्यार्थी चिंता आणि नैराश्याचे कारण बनले आहेत. त्यापैकी अनेकांच्या नोकऱ्या गेल्या आहेत आणि अजून किती जणांचे नुकसान होणार आहे. विद्यार्थी दिलेल्या गुणांबाबत असमाधानी आहेत आणि विद्यापीठाने ज्या पद्धतीने पेपर तपासणी प्रक्रिया केली आहे त्यात गैरप्रकार झाल्याचे विद्यार्थ्यांचे म्हणणे आहे या संपूर्ण प्रकरणाची एसआयटी मार्फत चौकशी करून विद्यार्थ्यांना न्याय द्यावा अशी आमची मागणी आहे.

धन्यवाद,

( नाना पटोले )

( पृथ्वीराज चव्हाण ) ( सुशीलकुमार शिंदे ) ( विजय वडेट्टीवार )

( सतेज पाटील ) (शिवाजीराव मोघे ) (अरिफ नसीम खान )

( चंद्रकांत हंडोरे ) ( प्रणिती शिंदे ) ( वर्षाताई गायकवाड )

INDIAN NATIONAL CONGRESS

# महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी


टिळक भवन, काकासाहेब गाडगीळ मार्ग, दादर, मुंबई - ४०० ०२५.
Email - office@mahacongress.com

दुरध्वनी - २४२३३०००
२४३०१३०१
२४३०१३६१
फॅक्स - २४२२५७३३


( कुणाल पाटील ) ( शाहू शहाजी छत्रपती ) ( वसंतराव चव्हाण )

( कल्याण काळे ) ( शोभा बच्छाव ) ( बळवंत वानखेडे )

( प्रतिभा धानोरकर ) ( नामदेव किरसान ) ( श्यामकुमार बर्वे )

Yashomati Thakur
यशोमती ठाकूर

( शिवाजीराव काळगे ) ( प्रशांत पडोळे )

आ. यशोमती ठाकुर

( गोवाल पाडवी ) ( विशाल पाटील )

AKPatil

11/4/24

INDIAN NATIONAL CONGRESS

# महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी

टिळक भवन, काकासाहेब गाडगीळ मार्ग, दादर, मुंबई - ४०० ०२५.
Email - office@mahacongress.com

दुरध्वनी - २४२३३०००
२४३०१३०१
२४३०१३६९
फॅक्स - २४२२५७३३

(अमित वि. देशमुख)

(नाना गावंडे
उपाध्यक्ष)

(प्रमोद मोरे)

वीरेन्द्र जगताप
(सरचिटणीस)

अनिरुद्ध उर्फ बबलू देशमुख
(आमदार)